# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **नागपूर, दि. २३ जुलै २०१९**

# दुर्बल घटक समितीच्या नवीन सदस्यांची निवड

**नागपूर, ता. २३ :** नागपूर महानगरपालिकेच्या दुर्बल घटक समिती सदस्यांची मंगळवारी (ता. २३) निवड करण्यात आली. महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवन येथे मनपाच्या विशेष सभेमध्ये ही निवड करण्यात आली. नवनिर्वाचित समितीच्या अध्यक्षपदी गोपीचंद कुमरे यांची निवड निश्चीत समजली जात आहे. तर राजेंद्र सोनकुसरे, रुतिका मसराम, शिल्पा धोटे, शकुंतला पारवे, अनिल गेंडरे, विद्या मडावी, वंदना भगत, ममता सहारे यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

दुर्बल घटक समितीचे अध्यक्ष व सदस्यपदासाठी भारतीय जनता पक्ष व बहुजन समाज पक्षाकडून सभागृहामध्ये महापौरांकडे पत्राद्वारे शिफारस केली. भारतीय जनता पक्षाकडून अध्यक्ष गोपीचंद कुमरे, राजेंद्र सोनकुसरे, रूतिका मसराम, शिल्पा धोटे, शकुंतला पारवे, अनिल गेंडरे, विद्या मडावी, वंदना भगत यांचे तर बहुजन समाज पक्षाकडून ममता सहारे यांच्या नावाची शिफारस पत्राद्वारे करण्यात आली. समितीच्या सदस्यासाठी काँग्रेस पक्षाकडून कोणाचेही शिफारस पत्र सादर न करण्यात आल्यामुळे समितीमध्ये कॉग्रस पक्षाच्या दोन जागा रिक्त आहेत. निवड झालेल्या सर्व सदस्यांचे सभागृहामध्ये अभिनंदन करण्यात आले.